महाराष्ट्र शासन

# भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती.

जीवशास्त्र विभागाची जुनी ईमारत, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परिसर, व्ही.एम.व्ही. रोड, अमरावती-४४४६०४
दूरध्वनी क्रमांक : ०७२१-२१९०४४२,२५३०२१४ ईमेल : director@gpiasamt.org, website : www.gpiasamt.org

---

केंद्रीय लोक सेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षा -२०१७ च्या पूर्व प्रशिक्षणसाठी ११ महिने पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती प्रवेशासाठी रविवार दिनांक ०९-१०-२०१६ रोजी प्रवेश परीक्षा (सीईटी) घेतली जाणार आहे.

१. प्रवेश क्षमता - एकूण ७०

अ. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती - ६०

ब. अनुसूचित जाती BARTI द्वारा अनुदानीत - १०

२ . प्रवेश परीक्षा पद्धत - प्रवेश पूर्व परीक्षा एकूण २०० गुणांची असेल. त्यात भाग-१, , सामान्य अध्ययन १०० गुणांचा असेल व भाग-२ सीसॅट १०० गुणांचा असेल. युपीएससी, नागरी सेवा परीक्षा २०१६ नुसार गुणवत्ता यादी भाग-१ सामान्य अध्ययन या भागावरील गुणांवर आधारीत राहील त्या करिता भाग -२ सीसॅट या भागामध्ये किमान ३३% म्हणजेच १०० पैकी ३३ गुण असणे अनिवार्य आहे. तसेच नागरी सेवा परीक्षा-२०१६ च्या अभ्यासक्रमावर आधारीत येथील प्रवेश पुर्व परीक्षाअसेल

* परीक्षेची वेळ - सकाळी ११.०० ते ०१.०० (२ तास)

३. सीईटी वस्तुनिष्ठ स्वरूपाची व प्रत्येक चुकीच्या उत्तराला १/३ किंवा ३३ टक्के एवढे मार्क कमी करण्यात येईल.

४. प्रवेश परीक्षा अर्हता

अ. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण

( युपीएससी नियमानुसार दिनांक ०२ ऑगष्ट १९८५ च्या आधीचा जन्म नसावा व दिनांक ०१ ऑगष्ट १९९६ नंतरचा जन्म नसावा)

ब. उमेदवाराचे वय ०१ ऑगस्ट २०१७ रोजी - २१ ते ३२ वर्ष (खुला संवर्ग)
२१ ते ३५ वर्ष (इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./भ.ज.)
२१ ते ३७ वर्ष (अनुसूचित जाती / जमाती)

क. उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी असला पाहिजे (Domicile of Maharashtra Certificate)
किंवा

शा.नि.क्र. रा.प्र.व्य. १०१८/(१७१/९८))मशि-१ दि. २४-०४-२००० नूसार उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवासी असल्यास त्याची/त्याच्या अर्जात तो / ती पात्रता परीक्षा महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील निर्देशित गाव किंवा शहरातील संस्थेमधून उत्तीर्ण झाल्याचे नमूद करणे आवश्यक असेल. तसेच अर्जासोबत संबंधीत विद्यार्थ्यांचे / विद्यार्थीनीचे पालक महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवासी असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि विद्यार्थी पात्रता परीक्षा संस्थेतून झाल्याचे व त्याची/तिची मातृभाषा मराठी असल्याचे संस्थेच्या प्राचार्यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच १० वी ची परीक्षा मराठी विषय घेवून उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

ड. प्री-आय.ए.एस. ट्रेनिंग सेंटर अमरावती च्या प्रारंभिक अथवा मुख्य परीक्षा प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना  प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही.

इ. संस्थेच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमात सहभाग घेता येणार नाही.

फ. वैद्यकीय पदवी धारकांनी Internship  पूर्ण करणे आवश्यक आहे.

५. परीक्षेसंबंधीत महत्वाची माहिती

* प्रवेश अर्ज ऑनलाईनवर भरण्याचे वेळापत्रक

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचा कालावधी | ०३-०९-२०१६ ते २०-०९-२०१६ |
| २ | बँक चलनाद्वारे  भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये प्रवेश परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी | ०३-०९-२०१६ ते २३-०९-२०१६ |
| ३ | लेखी परीक्षेसाठी प्रवेश पत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | २७-०९-२०१६ ते ०९-१०-२०१६ |

* प्रवेश अर्ज शुल्क (चलनाद्वारे) - रू. ३००/- खुला संवर्गाकरिता

व रू. १५०/-अ.जा./अ.ज./वि.जा./भ.ज./इ.मा.व./वि.मा.प्र.

www.preiasamt.in  या वेबसाईटवर परीक्षेसंबंधीत सर्व सुचना,माहिती पत्रक,अभ्यासक्रम उपलब्ध होईल.

सदर माहिती पोष्टाने पाठविण्यात येणार नाही.

*प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज व कोणतेही शैक्षणिक अर्हते बाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयात पाठविण्यात येवू नयेत. प्रमाणपत्रे अंतिम निवड प्रक्रियेमध्ये तपासण्यात येतील.

*ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी  www.preiasamt.in  या संकेतस्थळावरील सुचना काळजीपूर्वक वाचून त्याप्रमाणे अर्ज  भरण्यात यावा.

६. संस्थेतील प्रवेश व मर्यादीत वसतिगृह प्रवेश उपलब्धतेनुसार व प्रचलीत शासन निर्णय व नियमांच्या नुसार प्रवेश देण्यात येईल.

७. सुचना  -UPSC च्या सूचनेनूसार प्रवेश परीक्षेला बसणा-या उमेदवारांनी मोबाईल फोन , माहिती तंत्रज्ञान साधने व किंमती वस्तू जवळ बाळगू

नयेत

दिनांक : २६-०८-२०१६

डॉ. मुरलीधर वाडेकर

प्र. संचालक